Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील पायाभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास

*संशोधक नाव*
श्री. दिगंबर नामदेव इंगळे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षण शास्त्र महाविद्यालय य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यास केंद्र येवला -54499*

*मार्गदर्शक*
डॉ. रश्मी जोशी
**एम.ए. एम.एड्. पी.एच.डी**
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षण शास्त्र महाविद्यालय य.च.म.मु.विद्यापीठ अभ्यास केंद्र येवला -54499*

*सारांश–*

*इंग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय फरक आढळून येतो. बहुतांश इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आधुनिक व समृद्ध सुविधा उपलब्ध असतात, जसे की स्मार्ट बोर्ड, संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, खेळाचे मैदान व स्वच्छतागृहे. याउलट अनेक मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये या सुविधा मर्यादित स्वरूपात असतात किंवा त्यांची कमतरता जाणवते. इंग्रजी शाळा खासगी संस्थांकडून चालवल्या जात असल्याने त्यांना निधी अधिक प्रमाणात उपलब्ध असतो. तर मराठी शाळा प्रामुख्याने सरकारी किंवा निमसरकारी असल्याने निधी आणि व्यवस्थापनात अडचणी येतात. या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सर्व शाळांमध्ये समान व पुरेशा पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांमध्येही सुविधा वाढवण्यावर भर देणे आवश्यक आहे.*

CC BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्त्वाचे शब्द** – मराठी व इंग्रजी माध्यम, शाळा, पायाभूत सुविधा, तुलनात्मक अभ्यास

**संशोधन लेखाचा मुख्य भाग –**

संशोधन विषयाची पार्श्वभूमी – संशोधन समस्येचा ऐतिहासिक आढावा – सद्यस्थिती

१) मराठी शाळांच्या भौतिक सुविधांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.१) पारंपरिक गुरुकुल व पटशाळा (प्राचीन व मध्ययुगीन कालखंड)

शिक्षणासाठी खास इमारती नव्हत्याय मोठ्या झाडाखाली किंवा गुरूच्या घरीच शिकवले

जाई. पटशाळांमध्ये गवताने छप्पर असलेली छोटी झोपडी किंवा मंदिरातील मंडपांचा उपयोग केला जाई. विद्यार्थी जमिनीवर बसून शिकत आणि पाटी–चाफ्याच्या काडीने लेखन करत.

**१.३) ब्रिटीश कालखंड (१८व्या–१९व्या शतकात)**

ब्रिटिशांच्या आगमनानंतर मराठी शाळांसाठी साध्या कौलारू इमारती बांधल्या गेल्या. फळे–काठ्या, दगडी पट्ट्या आणि खडूचा वापर शिकवण्यासाठी होऊ लागला. शिक्षण संस्थांमध्ये ब–यापैकी बैठकीच्या सोयी उपलब्ध होऊ लागल्या, पण आधुनिक प्रयोगशाळा किंवा ग्रंथालये नव्हती.

**१.४) स्वातंत्र्यानंतर (१९४७–२०००)**

सरकारी शाळांसाठी पक्क्या इमारती बांधल्या गेल्या, मात्र अनेक शाळांमध्ये मूलभूत सुविधा (शौचालय, पाणी, वीज) अपुरी होती. १९७०–८० च्या दशकात काही मराठी शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळा आणि लायब्ररी सुरू झाल्या. शहरी भागातील काही मराठी शाळांमध्ये संगणक कक्षाची सुरुवात झाली, परंतु बहुतांश ग्रामीण भाग अद्याप मागे होता.

**१.५) सध्याची परिस्थिती (२००० नंतर)**

डिजिटल शिक्षणाचा समावेश वाढला आहे, काही शाळांमध्ये स्मार्ट बोर्ड आणि संगणक सुविधा आहेत. मात्र, अनेक मराठी शाळा पुरेशा निधीअभावी अद्याप मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. इंग्रजी शाळांच्या भौतिक सुविधांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**२.१) ब्रिटीशपूर्व कालखंड (१६व्या–१७व्या शतकात)**

पोर्तुगीज, डच आणि फ्रेंच लोकांनी भारतात काही इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या. त्या शाळांसाठी चर्च आणि मिशनरी केंद्रांचा उपयोग केला जात असे.

**२.1) ब्रिटीश कालखंड (१८३५–१९४७)**

१८३५ मध्ये लॉर्ड मॅकॉलेच्या शैक्षणिक धोरणामुळे इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला. इंग्रजी शाळांसाठी मजबूत इमारती बांधल्या गेल्या, काही शाळांमध्ये मोठी सभागृहे आणि लायब्ररी होत्या. मुंबई, कोलकाता आणि मद्राससारख्या शहरांमध्ये प्रयोगशाळा आणि क्रीडांगण असलेल्या शाळा सुरू झाल्या. शिक्षणासाठी लाकडी बाके, फळे–काठ्या, खडू व फळ्यांचा वापर सुरू झाला.

**२.2) स्वातंत्र्यानंतर (१९४७–२०००)**

इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांमध्ये उत्तम इमारती, वाचनालये, प्रयोगशाळा आणि क्रीडांगण उपलब्ध होऊ लागले. शाळांमध्ये लाकडी व स्टीलच्या बाकांची सोय, वीज, पाणीपुरवठा

आणि स्वच्छतागृहे यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध होऊ लागल्या. १९६० नंतर कंप्युटर लॅब आणि सायन्स लॅबसाठी विशेष भर देण्यात आला.

२.3) सध्याची परिस्थिती (२००० नंतर)

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूम, अत्याधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल लायब्ररी, क्रीडांगण, जलतरण तलाव आणि वातानुकूलित वर्ग उपलब्ध आहेत. ग्रामीण भागात इंग्रजी शाळांची संख्या वाढली असली, तरी काही ठिकाणी भौतिक सुविधा अपुर्‍या आहेत. अनेक शाळा तंत्रज्ञानाच्या मदतीने ऑनलाइन शिक्षण आणि स्मार्ट बोर्ड्सचा उपयोग करत आहेत.

**मराठी आणि इंग्रजी शाळांची सद्यस्थिती**

**१) मराठी शाळांची सद्यस्थिती**

मराठी शाळा हा महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. मात्र, गेल्या काही दश

१.१) **सरकारी मराठी शाळांची स्थिती**

महाराष्ट्रात अजूनही मोठ्या प्रमाणावर सरकारी मराठी माध्यमाच्या शाळा अस्तित्वात आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागात मराठी शाळांचा पाया भक्कम आहे. मात्र, विद्यार्थीसंख्या कमी होत चालली आहे, कारण पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वळत आहेत.

१.२) **मराठी शाळांचे आव्हाने**

इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या तुलनेत मराठी शाळांमध्ये सुविधा आणि तांत्रिक साधनसामग्री कमी आहे. पालकांना वाटते की इंग्रजी शिक्षण घेतल्यास मुलांना चांगल्या संधी मिळू शकतात. अनेक मराठी शाळा बंद पडत आहेत किंवा इंग्रजी माध्यमात रूपांतरित होत आहेत.

**इंग्रजी शाळांची सद्यस्थिती**

इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, विशेषतः शहरी भागात.

२.१) **इंग्रजी शाळांचे वाढते प्रमाणरू**

शासकीय आणि खाजगी संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू होत आहेत. CBSE, ICSE, IB आणि IGCSE अशा वेगवेगळ्या अभ्यासक्रमांच्या शाळांना प्राधान्य दिले जात आहे. ग्रामीण भागातही इंग्रजी शाळांकडे कल वाढत आहे.

२.२) **इंग्रजी शाळांचे फायदे**

जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी इंग्रजी शिक्षण उपयुक्त ठरत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल शिक्षण, उत्तम ग्रंथालये आणि प्रयोगशाळा यांसारख्या सुविधांमुळे इंग्रजी शाळांचा दर्जा

उच्च आहे.

२.३) इंग्रजी शाळांचे आव्हाने

शिक्षणाचे खर्चिक स्वरूपरू उच्च प्रतीच्या इंग्रजी शाळांचे शुल्क जास्त असल्याने सर्वसामान्यांसाठी त्या परवडत नाहीत. मातृभाषेपासून तुटलेपणाची भावनारू विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषेची गोडी कमी होत आहे. इंग्रजी माध्यमातील शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना मराठी भाषा आणि संस्कृतीशी घट्ट नाते ठेवण्याचे आव्हान आहे.

8. संदर्भसूची –

1) बापट, भा. गो. (1975). शैक्षणिक संशोधन पुणे नूतन प्रकाशन
2) भिंताडे वी. रा. (1994) शैक्षणिक संशोधन पद्धती पुणे नूतन प्रकाशन
3) मुळे रा.श. आणि उमाटे वि.तु. (1977) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ